ePaper
एप्रिल महिन्यात शाळा सुरु ठेवण्यास विरोध, प्रकरण कोर्टात जाणार

| वर्ष - 8 | अंक - 249 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

**आतील पानांत**
- आरसीबीने चेपॉकचं चक्रव्यूह भेदलं!
- कोहलीने खलीलवर टाकला कटाक्ष
- कुणाल कामराला मोठा दिलासा!
- मोदींच्या सुपर-१०० चा श्रीगणेशा!

www.mahaenews.com | शनिवार, दि. 29 मार्च 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


### वडिलांचे विवाहबाह्य संबंध आणि पैशाच्या चणचणीमुळे दिशा तणावात

# दिशा सालियन मृत्यूप्रकरणाला ट्विस्ट : मिलिंद सोमणची एन्ट्री!

## अनेक धक्कादायक खुलासे समोर : 'क्लोजर रिपोर्ट' वर नितेश राणे, निरुपम यांचा आक्षेप

। मुंबई । प्रतिनिधी । महाईन्यूज

**बॉलिवूड सेलिब्रिटी टॅलेंट मॅनेजर दिशा सालियन मृत्यूप्रकरणाला ट्विस्ट मिळत आहे. या प्रकरणी आता अभिनेता मिलिंद सोमण यांची एंट्री झाली असून त्यांचा जबाब मालवणी पोलिसांनी नोंदवला आहे. दरम्यान, दिशाच्या वडिलांचे विवाहबाह्य संबंध आणि पैशाची चणचण यामुळे ती प्रचंड तणावाखाली होती, असा पोलिसांनी निष्कर्ष काढला आहे. पोलिसांनी सादर केलेल्या 'क्लोजर रिपोर्ट' बद्दल संशय व्यक्त करून मंत्री नितेश राणे आणि शिवसेना नेते संजय निरुपम यांनी तीव्र आक्षेप घेतला आहे.**



### दररोज नवनवीन खुलासे समोर..

बॉलिवूड सेलिब्रिटी टॅलेंट मॅनेजर दिशा सालियन मृत्यूप्रकरणात वेगवेगळी माहिती समोर येत आहे. सामूहिक बलात्कार करून तिची हत्या करण्यात आल्याचा आरोप तिचे वडील सतीश सालियन यांनी केला असून त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका सुद्धा दाखल केली आहे.

### दिशा मृत्यूप्रकरणी मोठी 'अपडेट' !


मालवणी पोलिसांनी यापूर्वीच दिशा सालियन मृत्यूप्रकरणाचा 'क्लोजर रिपोर्ट' सादर केला होता. या रिपोर्टमध्ये अत्यंत धक्कादायक खुलासे आहेत. पोलिसांकडून दोन सेलिब्रेटींचा जबाब नोंदवला गेला होता.

### दिशा पटणीमुळे सालियन तणावग्रस्त

दिशा सालियन काम करत असलेल्या 'कॉर्नरस्टोन कंपनी' च्या जाहिरातीशी थेट संबंध असलेल्या अभिनेता मिलिंद सोमण आणि दिशा पटणी यांचा जबाब मालवणी पोलिसांनी नोंदवला होता, हे महत्त्वाचे आहे. दिशा पटणी आणि मिलिंद सोमण यांनी 'कॉर्नरस्टोन' या कंपनीशी दोन वेगवेगळ्या जाहिरातींसाठी करार केला होता. या दोन्ही सेलिब्रेटींशी संवाद ठेवण्याची आणि चर्चा करण्याची जबाबदारी दिशा सालियनवर होती. करारातील गोष्टी करायला सांगितल्या जात असताना दिशा पटणीने नकार दिल्याने दिशा सालियन तणावामध्ये होती, असे आता स्पष्ट होत आहे.

### मिलिंद सोमण काय म्हणाले?

मिलिंद सोमणने एका मोबाईल कंपनीची जाहिरात या कंपनीसोबत केली होती. मात्र करार संपल्यानंतर त्यांनी एक ट्विट केले होते. त्या ट्विटमुळे कंपनी अडचणीत आली होती. त्यावर त्या मोबाईल कंपनीने आक्षेप घेतला होता. करार संपुष्टात आल्याने मी केलेले ट्विट डिलीट करणार नाही, अशी भूमिका सोमण यांनी घेतली होती. कॉर्नरस्टोन कंपनीशी सबंधित या दोन बाबींमुळे दिशा मात्र तणावात होती, हेही एक कारण सांगण्यात आले आहे.



### 'क्लोजर रिपोर्ट' मध्ये आत्महत्याच!

पोलिसांच्या 'क्लोजर रिपोर्ट' मध्ये दिशाने आत्महत्याच केल्याचे नमूद करत ती कोणत्या कारणास्तव तणावात होती, हे स्पष्ट केले आहे.



### नितेश राणे, संजय निरुपम यांच्या मते सगळेच संशयास्पद!

या 'क्लोजर रिपोर्ट'वर मंत्री नितेश राणे आणि शिवसेना शिंदे गटाचेनेते संजय निरुपम यांनी तीव्र आक्षेप नोंदवला आहे. संजय निरुपम यांनी या प्रकरणातील मालवणी पोलिसांचा 'क्लोजर रिपोर्ट' संशयास्पद असल्याचे मत व्यक्त केले आहे. त्यांच्या मते, या प्रकरणाची चौकशी सुरू असताना उद्धव ठाकरे मुख्यमंत्री होते आणि त्यांच्या मुलगा आदित्य ठाकरे याचे नाव याप्रकरणात आले होते. त्यामुळे या चौकशीवर राजकीय दबाव असू शकतो. निरुपम यांनी पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत म्हटले की, मालवणी पोलिसांनी सरकारच्या दबावाखाली काहीतरी चौकशी करून निष्कर्ष काढला असावा. दरम्यान, पोलिसांच्या 'क्लोजर रिपोर्ट' मध्ये काहीही अर्थ नाही. दिशा सालियन हिच्या मृत्यूचे गूढ अद्याप उकललेले नाही आणि या प्रकरणातील सत्य बाहेर यावे, यासाठी नव्याने सखोल चौकशी होणे गरजेचे आहे. पूर्वी देशाचे वकील आणि वडील दोघेही तणावाखाली होते, त्यांनीच आता न्यायालयात धाव घेतली आहे, त्यामुळे तपास हा नि:पक्षपाती व्हावा, असे ते म्हणाले.

वडिलांच्या प्रेमसंबंधाबद्दलची माहिती, कंपनीच्या म्हणण्याप्रमाणे व्यवहार करण्यात अपयशी आणि काही आर्थिक बाबींच्या त्रासामुळे दिशा त्रस्त आणि तणावाखाली होती. म्हणून दिशाने आत्महत्या केल्याचा 'क्लोजर रिपोर्ट' मध्ये मुंबई पोलिसांचा निष्कर्ष आहे.


## आमदार सिद्धार्थ शिरोळे यांची माहिती

# विद्यापीठातील कोंडीचा ताण लवकरच हलका

## राजभवनकडे येणाऱ्या उड्डाणपुलाचे काम ऑगस्टपर्यंत पूर्ण केले जाणार

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गणेशखिंड रस्त्यावरील ब्रेमेन चौक ते ई-स्क्वेअर या मार्गातील उड्डाणपुलाची एक बाजू एक मे रोजी वाहतुकीसाठी खुली करण्यात येणार आहे. बाणेर आणि राजभवनकडे येणाऱ्या उड्डाणपुलाचे काम ऑगस्टपर्यंत पूर्ण केले जाणार असल्याने या मार्गावरील वाहतुकीची कोंडी सुटणार आहे. शिवाजीनगरचे आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात मांडलेल्या पुण्यातील प्रश्नांची माहिती पत्रकार परिषदेत दिली.**




'गणेश खिंड रस्त्यावरील ब्रेमेन चौक ते ई-स्क्वेअर या मार्गातील उड्डाणपुलाची एक बाजू वाहतुकीसाठी खुली झाल्यानंतर या भागातील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल. बाणेर आणि राजभवनकडे येणाऱ्या उड्डाणपुलाचे काम ऑगस्टपर्यंत पूर्ण केले जाणार आहे. त्यानंतर या मार्गावरील वाहतूक कोंडी सुटणार आहे,' असे शिरोळे यांनी सांगितले.ससून रुग्णालयातील प्रशासकीय व्यवस्थेमध्ये बदल करण्याची गरज असल्याची सूचना सरकारला केली आहे. जीबीएस रुग्णांसाठी अनुदानात वाढ करण्याची मागणीही केली आहे. जीबीएस रुग्णांना होणारा त्रास आणि होणारा खर्च विचारात घेऊन आयुष्मान योजना आणि महात्मा फुले जन आरोग्य योजनेद्वारे दोन लाखांपर्यंत दिल्या जाणाऱ्या अनुदानात वाढ करण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले आहे,' असे त्यांनी नमूद केले.माजी नगरसेवक दत्तात्रय खाडे, गणेश बागडे, रवींद्र साळेगावकर, सुनील पांडे, आनंद छाजेड, किरण ओरसे, सचिन वाडेकर, प्रकाश सोळंकी या वेळी उपस्थित होते.'शहराच्या सुरक्षेसाठी 'सीसीटीव्ही'चे सर्वंकष धोरण तयार करण्याची मागणी विधानसभेत केली होती. पोलीस, महापालिका, मेट्रो आणि अन्य काही खासगी संस्थांच्या माध्यमातून सीसीटीव्ही चालवण्यात येतात. या कॅमेऱ्यांच्या दर्जामध्ये फरक आहे. त्याची देखभालही होत नसल्याचे लक्षात आणून दिले. शहरात १० हजार कॅमेरे आहेत. आणखी १० हजार कॅमेरे बसविण्याची आवश्यकता आहे.'सीसीटीव्ही'साठीचे सर्वंकष धोरण येत्या महिन्याभरात करण्याचे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे.' असे सिद्धार्थ शिरोळे यांनी सांगितले.'मुंबईमध्ये वेगाने विकास होत आहे, नवी मुंबईमध्ये विमानतळ होत आहे. त्यामुळे पुणे-मुंबई इकॉनॉमिक कॉरिडॉर प्राधिकरण स्थापन करण्याची मागणी केली आहे,' असे आमदार शिरोळे यांनी स्पष्ट केले.'पुणे आणि खडकी कटक मंडळांचे महापालिकेमध्ये विलीनीकरण करण्यातील अडचणींतून मार्ग काढण्यासाठी येत्या १५ दिवसांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात येणार आहे. सध्या या परिसरातील जमिनींच्या मालकी हक्काचा प्रश्न आहे,' असे आमदार शिरोळे यांनी सांगितले.'गणेश खिंड रस्त्यावरील ब्रेमेन चौक ते ई-स्क्वेअर या मार्गातील उड्डाणपुलाची एक बाजू वाहतुकीसाठी खुली झाल्यानंतर या भागातील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल. बाणेर आणि राजभवनकडे येणाऱ्या उड्डाणपुलाचे काम ऑगस्टपर्यंत पूर्ण केले जाणार आहे.

### जीबीएस रुग्णांसाठी अनुदानात वाढ

जीबीएस रुग्णांसाठी अनुदानात वाढ करण्याची मागणीही केली आहे. जीबीएस रुग्णांना होणारा त्रास आणि होणारा खर्च विचारात घेऊन आयुष्मान योजना आणि महात्मा फुले जन आरोग्य योजनेद्वारे दोन लाखांपर्यंत दिल्या जाणाऱ्या अनुदानात वाढ करण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले आहे,' असे त्यांनी नमूद केले.

---

## पुण्यात कुणाल कामराच्या समर्थनार्थ फ्लेक्सबाजी

# कुणाल कामराच्या समर्थनार्थ फ्लेक्स लावणाऱ्यावर गुन्हा दाखल

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याविरोधात विडंबन काव्य करणाऱ्या कुणाल कामराविरोधात विधानसभेत जोरदार वादंग झाल्यानंतर आता त्याचे समर्थन करणारा फ्लेक्स पुण्यातील अलका चित्रपटगृहाजवळील छत्रपती संभाजी महाराज पुलावर लावण्यात आला होता. हा फ्लेक्स लावणाऱ्या अज्ञातावर विश्रामबाग पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.**




राजेंद्र भानुदास केवटे (वय ४२,रा.पर्णकुटी पायथा,लक्ष्मीनगर, येरवडा) यांनी विश्रामबाग पोलिसांत तक्रार दिली आहे. कुणाल कामरा याने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर वादग्रस्त गाणे केले होते. त्यावरुन राज्यात गदारोळ सुरु आहे. कामरा याच्याविरोधात गुन्हाही दाखल झाला आहे. कामरा याचे समर्थन करणारा फ्लेक्स छत्रपती संभाजी महाराज पुलाच्या कोपऱ्यावर लावण्यात आला आहे.

या फ्लेक्सवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे व्यंगचित्र काढण्यात आले आहे. त्याखाली ठाणे, रिक्षा, चष्मा, दाढी, गुवाहाटी आणि गद्दार या शब्दांना महाराष्ट्रात बंदी आहे का? असा मजूकर लिहिला आहे.

एकनाथ शिंदे यांच्या सोबत कुणाल कामरा याचेही फ्लेक्सवर व्यंगचित्र काढले आहे.

त्याच्याखाली शिवसेना पुणे शहर उद्धव बाळासाहेब ठाकरे असा मजकूर व त्यासोबत मशाल हे चिन्ह असलेला आक्षेपार्ह मजकूराचा फ्लेक्स कोणीतरी कोणतीही परवानगी न घेता बेकायदेशीररित्या लावलेला आहे. पोलीस उपनिरीक्षक किरण नरवडे तपास करीत आहेत.याबाबत राजेंद्र भानुदास केवटे (वय ४२, रा. पर्णकुटी पायथा, लक्ष्मीनगर, येरवडा) यांनी विश्रामबाग पोलिसांत तक्रार दिली आहे. कुणाल कामरा याने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर वादग्रस्त गाणे केले होते.

त्यावरुन राज्यात गदारोळ सुरु आहे. कामरा याच्याविरोधात गुन्हाही दाखल झाला आहे. कामरा याचे समर्थन करणारा फ्लेक्स छत्रपती संभाजी महाराज पुलाच्या कोपऱ्यावर लावण्यात आला आहे.

### फ्लेक्सवर व्यंगचित्र काढले

या फ्लेक्सवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे व्यंगचित्र काढण्यात आले आहे. त्याखाली ठाणे, रिक्षा, चष्मा, दाढी, गुवाहाटी आणि गद्दार या शब्दांना महाराष्ट्रात बंदी आहे का? असा मजूकर लिहिला आहे.एकनाथ शिंदे यांच्या सोबत कुणाल कामरा याचेही फ्लेक्सवर व्यंगचित्र काढले आहेआक्षेपार्ह मजकूराचा फ्लेक्स कोणीतरी कोणतीही परवानगी न घेता बेकायदेशीररित्या लावलेला आहे.

## मातेचे पूजन ही आपली संस्कृती

# माता सदा सर्वकाळ वंदनीय - पुष्पेन्द्र कुलश्रेष्ठ

### पुष्पेन्द्र कुलश्रेष्ठ "हिंदू कुलभूषण" पुरस्काराने सन्मानित

| पिंपरी-चिंचवड | महाईन्यूज | प्रतिनिधी|

**माता ही जगात सर्वश्रेष्ठ आहे. राजमाता जिजाऊ यांच्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज घडले. मातेचे पूजन ही आपली संस्कृती आहे. भूमाता, राजमाता, किंवा सामान्य जणांची माता सदा सर्वकाळ वंदनीय आहे, असे मत ज्येष्ठ वक्ते पुष्पेंद्र कुलश्रेष्ठ यांनी केले.**



निगडी येथील ग. दि. माडगूळकर सभागृह येथे हिंदू प्रतिष्ठानच्या वतीने हिंदू स्वाभिमान दिवसानिमित्त व शिवजयंतीचे औचित्य साधून पुष्पेन्द्र कुलश्रेष्ठ यांना "हिंदू कुलभूषण" पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच राष्ट्रप्रहरी या रौप्य महोत्सवी विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी हिंदू स्वाभिमान प्रतिष्ठानचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल, उपाध्यक्ष राजाभाऊ गोलांडे, सचिव उत्तम दंडीमे, , शिवजयंती उत्सवाचे समन्वयक कैलास बारणे व खजिनदार दत्ता सूर्यवंशी, सुहास पोफळे, अतुल आचार्य, कुमार जाधव, रमेश स्वामी, दिलीप कुलकर्णी, दिगंबर रिद्धीवाडे, नामदेव शिंत्रे, विजय गुंजाळ, शिवाजी रेड्डी, अॅड. देवदास शिंदे, मनोज गोबे, मनोज बोरसे, सुरेंद्र कर्मचंदानी अलका आर्य, तेजस्विनी जटाळ आदीं उपस्थित होते.

यावेळी पुष्पेन्द्र कुलश्रेष्ठ यांनी सांगितले की, १९५२ मध्ये संसदेत झालेल्या चर्चेत स्वतंत्र भारताची दिनदर्शिका करण्याबाबत चर्चा झाली. यावेळी तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू दबावात आले, त्यांनी समिती स्थापन केली. या समितीचे अध्यक्ष मेघनाथ साह व पुण्यातील दैनिक केसरीचे प्रतिनिधी आणि देशभरातील इतर सहा सदस्य होते. १९५७ मध्ये दोन्ही संसद सभागृहात दिनदर्शिका मंजुरीबाबत ठराव पास झाला. परंतु आद्यपही त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी झाली नाही. कुलश्रेष्ठ पुढे म्हणाले संसदेत बोलणाऱ्या खासदारांनी किमान तयारी करुन चर्चेत सहभाग घ्यावा व नंतर आपले मत व्यक्त करावे. संसद सभागृहात आपला स्वार्थ समोर ठेवून राजकीय मुद्दा मांडू नये, तर राष्ट्रीय स्वार्थ नजरेसमोर ठेवून राजकीय मुद्दा मांडला पाहिजे असे पुष्पेन्द्र कुलश्रेष्ठ म्हणाले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना काही लोकांनी केवळ एका जातीच्या चौकटीत बसवले आहे. काही लोक जाणून बुजून त्यांचे खरे कार्य लोकांच्या नजरेसमोर आणण्यास इच्छुक नाहीत.डॉ . बाबासाहेब आंबेडकर आपल्यापेक्षा मोठे व्हायला नको असे त्यांना वाटते. संसदेतील चर्चेत धर्मनिरपेक्षते बाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा मुख्य मुद्दा होता की, भारताच्या मातीत आणि सनातनी च्या रक्तातच धर्मनिरपेक्षता आहे. या धर्मनिरपेक्षतेला बंदिस्त करण्याचा प्रयत्न करू नका असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मत होते.

कुलश्रेष्ठ पुढे म्हणाले सावरकर ही व्यक्ती नसून विचार आहे. आरती, पूजापाठ करून कुणी हिंदू होत नाही, आचरणाने हिंदू झाले पाहिजे. स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात हिंदूंनी दुसऱ्याच्या धर्मस्थळावर, पूजा पद्धतींवर आक्रमण केल्याचे उदाहरण नाही. ही वेळ हिंदू मुस्लिम करण्याची नाही. तर सनातन सभेची पुनर्स्थापना करण्याची आत्ता वेळ आलेली आहे. हिंदू संस्कृती पुढच्या पिढीकडे देण्याचे काम स्व. धर्मवीर आर्य यांनी स्थापन केलेले हिंदू प्रतिष्ठान करत आहे.

सनातन एक सभ्यता आहे, विज्ञान आहे, पंचतत्व आहे. सनातन हा धर्म ब्रम्हांडाच्या उत्पत्ती पासून आहे. स्वागत कृष्णकुमार गोयल, सूत्रसंचालन व मानपत्र वाचन उत्तम दंडीमे, आभार सुहास पोकळे यांनी मानले.

#### संवाद होणे गरजेचे

मोबाईल मुळे कुटुंबातील व्यक्तींचे संवाद बंद झाले आहेत. त्यामुळे सर्व ज्येष्ठांनी आपल्या कुटुंबातील सर्व सदस्यांबरोबर संवाद वाढवावा. विशेष करून वयात आलेल्या मुलींबरोबर घरातील ज्येष्ठांचा संवाद झाला पाहिजे. जर संवाद होत नसेल तर, ती वयात आलेली तरुणी बाहेरील व्यक्तीशी संवाद साधेल आणि मग अडचणी वाढतील. आजचे युवक हे बुद्धिमान आहेत.युवकांच्या शक्तीमुळे देशात सत्तांतर झाले आहे. यामध्ये संचार क्रांती आणि समाज माध्यमांचे मोठे योगदान आहे असे पुष्पेन्द्र कुलश्रेष्ठ यांनी सांगितले.

## अतिरिक्त आयुक्तांची विद्यार्थ्यांसोबत 'परीक्षा पे चर्चा'

### पिंपरी चिंचवड महापालिकेचा क्रीडा प्रबोधनी शाळेत उपक्रम ; विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद

| पिंपरी-चिंचवड | महाईन्यूज | प्रतिनिधी|

**विद्यार्थ्यांनी परीक्षेला सामोरे जाताना काय काळजी घ्यावी, करिअरची निवड कशी करावी, अपयश आल्यानंतर खचून न जाता पुन्हा जोमाने प्रयत्न करीत यशाला गवसणी कशी घालावी, याबाबतचे सविस्तर मार्गदर्शन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी विद्यार्थ्यांना करतानाच विद्यार्थ्यांसोबत 'परीक्षा पे चर्चा' केली.**




महापालिकेच्या वतीने पिंपरी मधील उद्यमनगर येथील क्रीडा प्रबोधिनी शाळेत आयोजित केलेल्या 'परीक्षा पे चर्चा' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी जांभळे पाटील यांनी व्यासपीठावर न बसता थेट विद्यार्थ्यांसोबत बसून त्यांच्याशी खेळ, अभ्यास, छंद आणि भविष्यातील संधी आदी विषयांवर मनमोकळेपणाने संवाद साधला. शाळकरी विद्यार्थ्यांचा परीक्षा जवळ आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना तणावमुक्त परीक्षा देण्यासाठी प्रोत्साहन मिळावे, यासाठी महानगरपालिकेच्या वतीने क्रीडा प्रबोधिनी शाळेत 'परीक्षा पे चर्चा' कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी सहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात, माध्यमिक शिक्षणाधिकारी संगीता बांगर, मुख्याध्यापक जयराम वायळ, क्रीडा प्रमुख ऋषिकांत वचकल, शिक्षक सोनाली पाटील, संग्राम मोहिते, राहुल मोरे, अक्षता बांगर, मनोज राऊत, प्रमिला अल्हाट, दत्तात्रय कोळी, दिनेश राऊत, विजय पाटील, प्रियंका पाटील, गौरी गाडेकर यांच्यासह शाळेतील शिक्षक, कर्मचारी वृंद व विद्यार्थी उपस्थित होते. याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील म्हणाले, 'आयुष्यात यशस्वी होण्यासाठी लक्ष्य निश्चित करा. आपले क्षेत्र निवडून त्यामध्ये यश मिळवण्यासाठी प्रयत्न करा. आपले पालक आपल्याला सांगत आहेत, केवळ म्हणून अभ्यास न करता मनापासून अभ्यास करा. तुम्हाला यश नक्की मिळेल. तुमच्या आवडत्या क्षेत्रात करिअर करा. विविध खेळांमध्ये सहभागी होऊन क्रीडा क्षेत्रामध्येही तुम्ही चांगले करिअर करू शकता. महानगरपालिका तुम्हाला क्रीडा प्रशिक्षक, क्रीडा साहित्य, मैदान उपलब्ध करून देतच आहे. विद्यार्थ्यांसाठी उत्तम दर्जाच्या खेळाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महानगरपालिका प्रयत्नशील आहे. विद्यार्थ्यांनी देखील खेळामध्ये राष्ट्रीय स्तरावर आपल्या शहराला नावलौकिक मिळाले, अशा पद्धतीने क्रीडा क्षेत्रात कामगिरी करावी,' असे आवाहनही त्यांनी केले.

> "क्रीडा आणि शिक्षण यांचा समतोल राखत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणे हेच आमचे उद्दीष्ट आहे. महानगरपालिकेच्या क्रीडा प्रबोधिनी शाळेच्या माध्यमातून राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवर आपल्या शहराचे नाव उंचावणारे खेळाडू घडविण्यासाठी येथील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण व क्रीडा प्रशिक्षण आणि उत्कृष्ट सुविधा मिळाव्यात यासाठी आम्ही सतत प्रयत्नशील आहोत. आज शाळेतील विद्यार्थ्यांसोबत संवाद साधल्यामुळे क्रीडा क्षेत्रात मुलांना यशस्वी होण्यासाठी आणखी कोणत्या सोयीसुविधा उपलब्ध करणे आवश्यक आहे, हे देखील समजले असून त्यादृष्टीने भविष्यात नियोजन करणे शक्य होणार आहे.
>
> **–प्रदीप जांभळे पाटील,** अतिरिक्त आयुक्त

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### भगवंताची स्मृति आणि कर्तव्याची जागृति

प्रत्येक मनुष्य बोलताना 'मी' आणि 'माझे' अशा भाषेत बोलत असतो; म्हणजे प्रत्येक व्यक्तीला ह्या दोन्ही बाबतींत काही कर्तव्ये असतात. 'माझे' या शब्दात शरीर आणि तत्संबंधी सर्व गोष्टी येतात. आयुष्यात 'मी' चे कर्तव्य परमेश्वरप्राप्ती हे आहे; आणि देहाचे कर्तव्य देहाशी संबंधित असलेल्या प्रत्येक व्यक्तीबद्दलचे असते. देहाच्या कर्तव्यात धर्म, शास्त्र आणि नीती यांना धरून, संबंधित व्यक्तीशी करण्याच्या आचरणाचा समावेश होतो; म्हणजेच, ज्याच्याशी जसा आपला संबंध असेल त्याप्रमाणे त्याच्या बाबतीत आपले कर्तव्य चोख पार पाडणे. 'कर्तव्य' याचा अर्थ मोबदल्याची अपेक्षा न ठेवता ज्या ज्या बाबतीत जे करणे योग्य असेल ते करणे, असा आहे. मनुष्याने 'मी' आणि देह या दोहोंच्या बाबतींतली कर्तव्ये समान चालीने करीत राहिले पाहिजे. 'मी' चे कर्तव्य करीन पण देहाने कसाही वागेन, असे म्हणून चालणार नाही. याचे कारण असे आहे की, समजा, एखादा मनुष्य नोकरी करीत आहे; तो ती नोकरी कशाकरिता करतो याचा विचार केला तर असे दिसते की, ती नोकरी करायला दुसरे कोणी नव्हते म्हणून तो ती नोकरी करीत नसतो, तर त्या नोकरीतून मिळणारा पैसा कुटुंबरक्षणाकरिता उपयोगी पडेल म्हणून तो ती नोकरी करीत असतो. समजा, त्याने नोकरी केली पण मिळणारा पैसा घरात दिला नाही, तर त्या नोकरीचा काही उपयोग नाही. तसे, 'मी' चे कर्तव्य, म्हणजे भगवंताचे अनुसंधान केले, पण देहाचे कर्तव्य, म्हणजे सदाचरण आणि संबंधित व्यक्तींशी असलेली कर्तव्ये न केली, तर नोकरी करून पैसे घरी न दिल्यासारखे होईल. म्हणून प्रत्येक व्यक्तीने भगवंताची स्मृती आणि कर्तव्याची जागृती ठेवावी; आणि या दृष्टीने आपले कुठे चुकते आहे याचा शोध दर वाढदिवसाच्या निमित्ताने घेऊन, प्रत्येकाने आपली उन्नती करून घ्यावी. जेवताना भोवती उदबत्तीचा सुंदर वास आणि तोंडात गोड घास जसा असावा, त्याप्रमाणे आपण बाहेर गोड बोलावे आणि आत भगवंताचे गोड नाम घ्यावे; म्हणजेच, आपण आत-बाहेर गोड असावे.

ज्याप्रमाणे एखादा गवई पुष्कळ ताना मारतो, पण शेवटी समेवर येतो, त्याचप्रमाणे भगवंताजवळ लक्ष ठेवून मग आपण काहीही केले तरी हरकत नाही. समेला विसरून मात्र उपयोग नाही. इथे तबला वाजविणारा भगवंतच आहे; म्हणून त्याचा ठेका बरोबर चालतो. ठेक्याप्रमाणे, म्हणजे भगवंताच्या ठेक्याला अनुसरून, म्हणजेच त्याच्या स्मरणात, जो गवई गाईल तो बरोबर मार्गावर राहील आणि शेवटी समेवर येईल.

**बोधवचन:- फळाची अपेक्षा सोडून कर्म करणे याचे नाव कर्तव्य होय.**



## 'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील

संस्थापक, संपादक

**महाराष्ट्रामधील विरोधी पक्षांना सध्या काही कामच राहिलेले नाही. सत्ताधारी 'महायुती' ला प्रचंड बहुमत मिळाले असल्यामुळे आता पाच वर्षे काय करायचे? हा प्रश्न विरोधी आघाडीच्या सदस्यांना पडला आहे.**

### छे..! पाच वर्षे विरोधी बाकांवर ?

राज्यात 'महायुती' ला एवढे बहुमत मिळाले आहे, की पाच वर्षे चुकून सुद्धा त्यांची सत्ता डळमळीत होणार नाही. यावर अनेक कार्यकर्त्यांनी उपाय शोधला तो म्हणजे एक तर महायुती मधील एका पक्षात प्रवेश करून टाका, किंवा त्यांच्या प्रत्येक मुद्द्यावर वेळोवेळी विरोध करा ! यामधूनच पुढे आली ती औरंग्याची कबर आणि रायगड वरील वाघ्या कुत्र्याची समाधी.. हे दोन्ही मुद्दे सुद्धा राजकारणात आता न चालणारे आहेत..पण, त्याशिवाय विरोधकांच्या हातात काहीही उरलेले नाही!

### समस्या किती ? वाद कशावर ?

एकूणच राजकारणाची स्थिती पाहिली तर त्यांना एखादा 'वाद' चघळायला दिला, की त्यावरच त्यांचे पोट भरते. एवढेच नव्हे तर, त्यांच्याबरोबरच प्रसारमाध्यमाचेही पोट भरते. 'इडियट बॉक्स' वरील चॅनेलवाल्यांना दिवसभर काय दाखवावे? याची भ्रांत उरत नाही. महाराष्ट्रात रोज नवे वाद निर्माण होत आहेत, केले जात आहेत. त्यातच राजकीय नेते समाधानी आहेत, ही खरी गमतीशीर बाब आहे

### औरंग्या, कामरा आणि आता वाघ्या..


सध्या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर खालच्या दर्जाची टीका करणाऱ्या कुणाल कामराचा वाद पेटला आहे. त्याआधी औरंगजेबाची कबर गाजली. गेले दोन-तीन दिवस वाघ्या श्वानाचे स्मारक म्हणजेच समाधी गाजत आहे. मूळ प्रश्नांना बगल देऊन हे नवीन काय चालले आहे, आणि ही वादावादी नेमकी कशासाठी हेच समजेनासे झाले आहे.

### जनतेचे गंभीर प्रश्न गेले खड्ड्यात..

विविध वादांच्या गदारोळात सर्वसामान्य जनतेचे प्रश्न, बेरोजगारी, वाढती महागाई, शेतकऱ्यांच्या आत्महत्या असे अनेक गंभीर प्रश्न खड्ड्यात फेकले गेले आहेत. हे सारे पाहिल्यानंतर महाराष्ट्र ही वादांची जननी आहे काय, असा प्रश्न पडतो. एक वाद धुमसत असतानाच दुसरा वादही हळूच डोके वर काढतो. कुणाल कामरा वादाचे कवित्व सुरू असतानाच 'वाघ्या' श्वानाचा वाद पेटला असून, या वादात उडी घेणारे एकमेकावर भुंकत आहेत. महाराष्ट्रातील रायगड किल्ल्यावरील वाघ्या श्वानाच्या स्मारकाबाबत काही दिवसांपासून वाद धुमसत आहे, हे महत्त्वाचे आहे.

# वाघ्याच्या समाधीवरून भुंकणे सुरू, औरंग्याच्या कबरीवरून थुंकणे सुरू!





### रायगडवरील वाघ्याचे स्मारक हटवा...

रायगडवरील वाघ्याचे स्मारक काढून टाकावे, अशी मागणी संभाजीराजे छत्रपती यांनी केली आहे. या मागणीला धनगर समाज व विरोधी पक्षांनी विरोध केला. त्यावर संभाजीराजे छत्रपती यांनी वाघ्या स्मारकाबाबत पुरावा नसल्याची कागदपत्रे दिल्लीत पत्रकार परिषदेत मांडली आणि हे स्मारक हटवावे अशी पुन्हा मागणी केली. संभाजीराजे म्हणाले, पुरातत्व खात्याने माहितीच्या अधिकारात स्पष्टपणे सांगितले आहे की, वाघ्या श्वानाच्या स्मारकाची सुरक्षित स्थळांच्या यादीत कुठेही नोंद नाही. 'राजसंन्यास' नाटकातून वाघ्या श्वानाची दंतकथा निर्माण झाली आहे. त्यामुळे वाघ्या कुत्र्याचे स्मारक हटवावे. रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीजवळ वाघ्या श्वानाची समाधी आहे. या समाधीची उंची छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीपेक्षाही जास्त आहे. याआधीही अनेकवेळा वाघ्या श्वानाच्या समाधीला कोणताही ऐतिहासिक संदर्भ नसल्याचा मुद्दा अनेक शिवप्रेमींनी उपस्थित केला होता. आता छत्रपती घराण्याचे १४ वे वंशज संभाजीराजे छत्रपतींनी हा मुद्दा उपस्थित केल्यानंतर त्यावर पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे.

### वाघ्याचे स्मारक : पुरातत्व खात्याकडे लक्ष..

संभाजीराजे छत्रपती यांनी वाघ्याचे स्मारक हटवण्यात यावे,अशी मागणी करणारे पत्र मुख्यमंत्र्यांना दिले आहे. मात्र, त्यांच्या या मागणीला भाजप आमदार गोपीचंद पडळकर आणि संपूर्ण धनगर समाजाने विरोध केला आहे. वाघ्याचे स्मारक १९३६ ला पूर्ण झाले. २०३६ पर्यंत हे स्मारक काढले नाही, तर त्याची नोंद संरक्षित स्थळांच्या यादीत होईल, अशी माहिती पुरातत्व विभागाने दिली आहे.

### 'राज्यसंन्यास' नाटकांमधून दंतकथा पसरवली..

वाघ्याच्या समाधीला कुठलाही ऐतिहासिक संदर्भ नाही. छत्रपती शिवाजी महाराजांना अग्नी दिला जात होता, तेव्हा वाघ्याने त्यात उडी घेतल्याचे कोणतेही ऐतिहासिक पुरावे नाहीत. वाघ्याचे स्मारक का उभे राहिले, यावर अनेक वाद आहेत. महाराष्ट्रातील एकाही इतिहासकाराने वाघ्याचे ऐतिहासिक संदर्भ आहेत, असे म्हटलेले नाही. 'राजसंन्यास' नाटकातून एक दंतकथा निर्माण झाली. या नाटकाने छत्रपती संभाजी महाराजांची बदनामी केली. याच नाटकाने वाघ्याची दंतकथा निर्माण केली आणि त्याचे स्मारक बांधण्यात आले, असे अनेक इतिहासकारांचे म्हणणे आहे. दुर्दैवाने तुकोजीराव होळकर महाराजांचे नाव तिथे जोडले जात आहे. त्यांनी या स्मारकासाठी मदत केली असे म्हटले जात आहे. मल्हारराव होळकर, यशवंत होळकर, पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांनी स्वराज्य स्थापनेसाठी योगदान दिले. अशावेळी तुकोजीराव महाराज वाघ्याच्या (श्वानाच्या) समाधीला मदत कशी करतील, असा सवाल संभाजीराजेंनी केला.

### आत्ताच वाद का उफाळून आले..

पुरोगामी महाराष्ट्रात अलिकडे मुद्दामहून काही वाद उकरून काढले जात आहेत. औरंगजेबाची कबर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील खुलताबाद येथे आहे. या कबरीला चारशेहून अधिक वर्षे झाली आहेत. या चारशे वर्षांत या कबरीला हटवण्याचे प्रयत्न कुणीही केले नाहीत. इतकेच काय पण छत्रपती संभाजीराजे यांची क्रूरपणे हत्या झाल्यानंतरही एकाही मराठा, सरदाराने अथवा त्यानंतर पेशव्यांनाही ही कबर हटवावी, असे वाटले नाही. मग आजच ही कबर हटवावी असे का वाटते? याचे गौडबंगाल कायम आहे !

### संभाजीराव भिडे यांची वादात उडी...

वाघ्याच्या या मुद्द्यावर संभाजीराव भिडे यांनी उडी घेतली असून वाघ्या म्हणजे अनेकांच्या भावनात्मक मुद्द्यांचा गुंता आहे, त्यामुळे ती हटवू नये, असे आवाहन त्यांनी केले आहे. खरे तर पुरोगामी महाराष्ट्राने आपसातील वाद शांततेने सोडवण्याची खरी गरज आहे. महाराष्ट्र अशांत राहिला, तर त्याचे दुष्परिणाम सर्वसामान्य जनतेलाच भोगावे लागतात. म्हणून कोणतेही वादग्रस्त प्रश्न असले तरी ते शांततेच्या मार्गानेच सोडवण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत. औरंगजेबाच्या कबरीचे उदात्तीकरण करण्याची गरज नाही. वाघ्या श्वानाच्या स्मारकाबाबत एखादी दंतकथा असेल तर बिघडले कुठे? त्याच्या इमानदारीबद्दल तर शंका घेण्यास जागा नाही ना ! श्वानाची इमानदारी आपण आजही अनुभवतो आहोतच. मग एखादी दंतकथा दंतकथाच राहू द्या ना..चल रं वाघ्या रडू नको..पाया कुणाच्या पडू नको.. दुनिया सारी कधी उलटली, न मला कधी सोडू नको ! असे अभिनेते दादा कोंडके पूर्वी सांगून गेले आहेत.

### विकास प्रक्रियेतील स्पीड ब्रेकर!

खरोखर विकसित महाराष्ट्राचे स्वप्न पाहणाऱ्या मराठी माणसासाठी अशा प्रकारचे वाद हे विकासामधील 'स्पीड ब्रेकर' आहेत. कोणालाही वाद नको आहेत फक्त विकास हवा आहे, त्यासाठीच महायुतीला भरभरून कौल मिळाला आहे, हे निश्चित !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# उजनी धरणामध्ये अवैध मासेमारी फोफावली!

## अजित पवार व मंत्री दत्तात्रय भरणे यांचा मत्स्यबीज सोडण्याचा निर्णय

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**उजनी धरणामध्ये सुरू असलेल्या अवैध मासेमारीला लगाम घालण्यासाठी येथील धरणग्रस्त व स्थानिक मच्छीमार आक्रमक झाल्याचे पहावयास मिळाले. अवैध मासेमारीला प्रोत्साहन देणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी स्थानिक मच्छीमारांनी यावेळी केली. त्यावर वडाप व पंड्याच्या साहाय्याने अवैद्य मासेमारी करणाऱ्यांवर आता थेट गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याचे आश्वासन पोलीस व जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिले.**



स्थानिक मच्छिमारांच्या निर्माण झालेल्या समस्या जाणून घेण्यासाठी दि.२७ रोजी भिगवणचे सहाय्यक पोलिस निरीक्षक विनोद महांगडे यांनी बैठकीचे आयोजन केले होते. याप्रसंगी उपस्थित मच्छिमारांनी अन्यायाचा पाढा वाचला व उजनीतील सामान्य मच्छिमारांच्या व्यवसायात गुन्हेगारीची पाळेमुळे किती घट्ट झाले आहेत याच माहिती देण्यात आली. अवैध मासेमारीला पाठबळ देणाऱ्यावर गुन्हा दाखल कारण्याची मागणी एकमुखाने करण्यात आली. अवैद्य मासेमारीला विरोध करणाऱ्या मच्छिमारांना मासळी बाजारात येऊ न देण्याचा धमक्या देण्यात येत असल्याचा तक्रारी करण्यात आल्या.गेली २८ वर्षे सुरू असलेली अवैद्य मासेमारी व मत्स्यबीज न सुटल्याने मत्स्य संपदा व जैविक साखळी धोक्यात आली होती.सुमारे ५० हुन अधिक माश्यांच्या जाती दुर्मीळ व नामशेष झाल्या होत्या. त्यामुळे स्थानिक व धरणग्रस्त मच्छिमारांचा रोजगाराचा प्रश्न गंभीर बनला होता.तर दुसऱ्या बाजुने प्रदूषण वाढले आहे.ही बाब लक्षात घेऊन राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार व कॅबिनेट मंत्री दत्तात्रय भरणे यांनी २०२४ पासुन धरणात शासनामार्फत मत्स्यबीज सोडण्याचा राज्यातील पहिला धोरणात्मक निर्णय घेतला.

तसेच सोडलेले मत्स्यबीज आणि इतर प्रजातींचे संवर्धन होण्यासाठी कोणत्याही आकाराच्या वडाप व पंड्याच्या साहाय्याने मासेमारीवर बंदी घातली आहे.याचा दृष्य परिणाम यंदा मत्स्य उत्पादन वाढीवर झाला आहे. असे असताना पाणी पातळी कमी होऊ लागताच वडाप व पंड्याच्या साहाय्याने दैनंदिन २० ते ४० टन अवैद्य मासेमारी सुरू करण्यात आली आहे.यामुळे पुन्हा मत्स्यउत्पादन घटून मच्छिमारांवर उपासमारीची वेळ येण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. सहाय्यक पोलिस निरीक्षक विनोद महांगडे व जलसंपदा विभागाचे उपविभागीय अभियंता एन.एम. खाडे यांनी आता वडाप व पंड्याच्या साहाय्याने मासेमारी करणाऱ्यांवर थेट गुन्हे दाखल करण्याची मोहीम उघडण्याचे आश्वासन दिले तसेच जिल्हाधिकारी यांनी नेमलेल्या पोलीस, जलसंपदा,मत्स्यव्यवसाय विभाग,महसूल विभाग,प्रदूषण मंडळ समितीही सोबत घेऊन संयुक्त कारवाई सुरू तर करून मात्र ३१ एप्रिल नंतर कारवाईची धडक मोहीम हाती घेण्यात येईल असे सांगण्यात आले.महांगडे यांनी रात्री अपरात्री देखिल कारवाईस पोलीस सज्ज असतील असे सांगितले.तसेच ज्या कृती संघटनेमुळे समाजात तेढ निर्माण होत आहे त्याला नोटीस देणार असुन उजनीत मासेमारीवरून जर कोणता अनुचित प्रकार घडला तर त्या पदाधिकाऱ्याला जबाबदार धरून कारवाई केली जाईल असे स्पष्ट करण्यात आले.स्थानिक मच्छिमारांच्या निर्माण झालेल्या समस्या जाणून घेण्यासाठी दि.२७ रोजी भिगवणचे सहाय्यक पोलिस निरीक्षक विनोद महांगडे यांनी बैठकीचे आयोजन केले होते. याप्रसंगी उपस्थित मच्छिमारांनी अन्यायाचा पाढा वाचला व उजनीतील सामान्य मच्छिमारांच्या व्यवसायात गुन्हेगारीची पाळेमुळे किती घट्ट झाले आहेत.

### राज्यातील पहिला धोरणात्मक निर्णय

अवैद्य मासेमारीला विरोध करणाऱ्या मच्छिमारांना मासळी बाजारात येऊ न देण्याचा धमक्या देण्यात येत असल्याचा तक्रारी करण्यात आल्या.गेली २८ वर्ष सुरू असलेली अवैद्य मासेमारी व मत्स्यबीज न सुटल्याने मत्स्य संपदा व जैविक साखळी धोक्यात आली होती. सुमारे ५० हुन अधिक माश्यांच्या जाती दुर्मीळ व नामशेष झाल्या होत्या.त्यामुळे स्थानिक व धरणग्रस्त मच्छिमारांचा रोजगाराचा प्रश्न गंभीर बनला होता.तर दुसऱ्या बाजुने प्रदूषण वाढले आहे.ही बाब लक्षात घेऊन राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार व कॅबिनेट मंत्री दत्तात्रय भरणे यांनी २०२४ पासुन धरणात शासनामार्फत मत्स्यबीज सोडण्याचा राज्यातील पहिला धोरणात्मक निर्णय घेतला.

# पोलिसांची ड्युटी आठ तास होणार!

## प्रत्यक्षात अंमलबजावणी कधी? पोलिसांचा सवाल

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**मुंबई पोलिसांसाठी ५ मे २०१६ पासून ८ तास ड्युटीची सुरुवात देवनार पोलीस ठाण्यातून झाली होती. तिचे लोण राज्यातील अनेक जिल्ह्यांत पोहोचले. मात्र ज्या मुंबईतून ही सुरुवात झाली तेथेच याबाबत उदासीनता दिसून आलेली आहे. त्यामुळे गेल्या ९ वर्षांत ही ड्युटी १०० टक्के झालेली नाही. मात्र असे असले तरी आता पुन्हा एका मानव अधिकारी संस्थेच्या निवेदनाचा विचार करत याबाबत मुंबईतील पोलिसांच्या प्रादेशिक विभाग स्तरावरून या ड्युटीबाबत चाचपणी केली जात आहे.**



दरम्यान, असे असले तरी प्रत्यक्षात अंमलबजावणी कधी होणार असा सवाल पोलिसांतून केला जात आहे.पोलिसांसाठी ही ८ तास ड्युटी मुंबईत किरकोळ स्वरूपात सुरू आहे. त्यामुळे याबाबत मानव अधिकारी संरक्षण समितीच्या वतीने मुंबई पोलिस आयुक्त कार्यालयात याबाबत पत्रव्यवहार करण्यात आला आहे. त्यात म्हटले आहे की, पोलिसांच्या शारीरिक व्याधी तसेच कौटुंबिक, मानसिक आणि वैयक्तिक समस्या पाहता इतर सरकारी कर्मचाऱ्यांसारखी त्यांना १२ ऐवजी ८ तासांची ड्युटी केली जावी.

त्यानुसार आता मुंबई पोलिस आयुक्तालयातील पोलिस उप आयुक्त (अभियान) शाखेतून मुंबईतील पोलिसांच्या प्रादेशिक विभागांचे अप्पर पोलिस आयुक्त यांना आदेश देण्यात आले आहेत. मुंबई पोलिस त्यौत म्हटले आहे की, मानव अधिकार संरक्षण समितीचे अध्यक्ष भगवानभाई दाठिया यांनी गेल्या ६ जानेवारी रोजीचे एका पत्रातून ही मागणी केली आहे. त्यामुळे त्याबाबत अवलोकन करण्यात यावे. तसेच आपल्या अखत्यारीतील परिमंडल पोलीस उपायुक्त यांच्याकडून याबाबत अहवाल मागवावा, तीन वर्षांपूर्वी म्हणजेच २१ मार्च २०२२ रोजी तत्कालीन मुंबई पोलिस आयुक्तांनी सर्व अपर पोलीस आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईतील पोलीस अंमलदारांसाठी 'कर्तव्य समिती' स्थापन करण्यात आली होती. या समितीने दिलेल्या अहवालावरून त्यावेळी आयुक्तालयाने ४ मे २०२२ अन्वये स्थायी आदेश जारी केला होता. त्यात '८ तास कर्तव्य व १६ तास आराम' ही संकल्पना यशस्वी आयुक्तालयातातून दिले आदेश करण्याची जबाबदारी नोडल अधिकारी या नात्याने प्रत्येक प्रादेशिक विभागांचे अपर पोलीस आयुक्त यांच्यावर सोपविली होती. आता त्या समितीचा अहवालही अप्पर पोलीस आयुक्त कार्यालयांना पाठवल्याचे, सांगण्यात आले आहे. दरम्यान, पोलिसांच्या ८ तास ड्युटीबाबत गेल्या ९ वर्षात कमी अधिक प्रमाणात प्रयत्न करण्यात आले आहेत.

### सध्याच्या हालचाली

८ तास ड्युटीबाबत मनुष्यबळाचे नियोजन करण्यासाठी मुंबईतील प्रादेशिक विभागाच्या अप्पर पोलीस आयुक्तांनी त्यांच्या अखत्यारीतील पोलीस उपायुक्तांना सूचित केल्याची माहिती देण्यात आली आहे. तत्कालीन पोलीस आयुक्त यांच्या ४ मे २०२२ च्या आदेशानुसार अंमलबजावणी कशी करता येईल.

# मोदींच्या सुपर-100 चा श्रीगणेशा!

## मध्य प्रदेशातून भाजपची विशेष मोहीम 'मी भाजपा फ्युचर फोर्स' सुरू होणार

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**भाजपाची 'मी भाजपा फ्युचर फोर्स आहे' ही विशेष मोहीम मध्य प्रदेशपासून सुरू होणार आहे, ज्यामध्ये पंतप्रधान मोदींच्या भावी नेत्यांना प्रशिक्षण दिले जाईल. भाजपा २९ आणि ३० मार्च रोजी मध्य प्रदेशात एक विशेष कार्यशाळा घेणार आहे. भाजपाने गैर-राजकीय पार्श्वभूमीतील १०० व्यावसायिकांची निवड केली आहे, ज्यांना ते प्रशिक्षण देईल, हे पंतप्रधान मोदींच्या भावी नेत्यांचे पहिले प्रशिक्षण मानले जाते. वेगवेगळ्या कामांमध्ये सहभागी असलेल्या अशा लोकांना राजकारणात सक्रिय करण्याची तयारीही पक्ष करत आहे.**



या प्रशिक्षणात या व्यावसायिकांना भाजपाच्या धोरणांची आणि रणनीतींची माहिति दिली जाईल आणि त्यानुसार काम केले जाईल, असे सांगण्यात येत आहे.भाजपाचे वरिष्ठ नेते देणार प्रशिक्षण मध्य प्रदेशात, भाजपा १०० व्यावसायिकांना प्रशिक्षण देईल, ज्यामध्ये वकील, अभियंते, डॉक्टर, चार्टर्ड अकाउंटंट, सामाजिक कार्यकर्ते, स्टार्टअप्स, पत्रकार, माजी सैन्यदल, आयआयटीयन, तरुण उद्योजक, महिला उद्योजक अशा विविध क्षेत्रातील लोकांचा समावेश असेल. भाजपाचे वरिष्ठ नेते या सर्वांना प्रशिक्षण देतील, असे म्हटले जात आहे की ही भविष्यासाठी भाजपाची एक मोठी योजना मानली जात आहे, ज्याची तयारी बऱ्याच काळापासून सुरू होती.भाजपाने या प्रकल्पासाठी यापूर्वी ७५० लोकांची निवड केली होती, त्यापैकी १०० प्रमुख लोकांची पुन्हा निवड करण्यात आली. आता या व्यावसायिकांना त्या आधारावर प्रशिक्षण दिले जाईल. खरं तर, भाजपाचा हा प्रकल्प खूप मोठा आहे, म्हणूनच मध्य प्रदेशची या कामासाठी निवड करण्यात आली आहे, कारण मध्य प्रदेश हे भाजपाचे सर्वात मजबूत संघटन असलेल्या राज्यांपैकी एक आहे. एकामागून एक अनेक निवडणुकांमध्ये भाजपने मध्य प्रदेशात आपले वर्चस्व दाखवले आहे, म्हणूनच भाजपाचे सर्वात मजबूत संघटन मध्यप्रदेशात मानले जाते, म्हणूनच हा कार्यक्रम येथून सुरू केला जात आहे. ज्या लोकांना कौटुंबिक राजकीय पार्श्वभूमी नाही त्यांना राजकारणात संधी मिळावी यावर पंतप्रधान मोदी सतत भर देत आहेत. भाजपा या योजनेअंतर्गत काम करत असल्याचे सांगितले जात आहे. जे मध्य प्रदेशपासून सुरू होणार आहे. यापूर्वी, भाजपने सदस्यता मोहिमेद्वारे मोठ्या संख्येने व्यावसायिकांना पक्षात समाविष्ट केले होते. मुख्यमंत्री मोहन यादव यांच्यासह रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव, वीरेंद्र खटिक, दिल्लीतील भाजपा खासदार बांसुरी स्वराज, ज्येष्ठ नेते डॉ. विनय सहस्रबुद्धे, भाजपा राष्ट्रीय सह-संघटना महासचिव शिवप्रकाश, राज्य संघटन महासचिव हितानंद शर्मा यांच्यासह भाजपा प्रदेशाध्यक्ष व्हीडी शर्मा, विधानसभा अध्यक्ष नरेंद्र सिंह तोमर, मंत्री कैलाश विजयवर्गीय तसेच राज्यातील काही वरिष्ठ मंत्री या कार्यशाळेत सहभागी होतील.या प्रशिक्षणात या व्यावसायिकांना भाजपाच्या धोरणांची आणि रणनीतींची माहिती दिली जाईल आणि त्यानुसार काम केले जाईल, असे सांगण्यात येत आहे.भाजपाचे वरिष्ठ नेते देणार प्रशिक्षण मध्य प्रदेशात, भाजपा १०० व्यावसायिकांना प्रशिक्षण देईल, ज्यामध्ये वकील, अभियंते, डॉक्टर, चार्टर्ड अकाउंटंट, सामाजिक कार्यकर्ते, स्टार्टअप्स, पत्रकार, माजी सैन्यदल, आयआयटीयन, तरुण उद्योजक, महिला उद्योजक अशा विविध क्षेत्रातील लोकांचा समावेश असेल. भाजपाचे वरिष्ठ नेते या सर्वांना प्रशिक्षण देतील, असे म्हटले जात आहे की ही भविष्यासाठी भाजपाची एक मोठी योजना मानली जात आहे, ज्याची तयारी बऱ्याच काळापासून सुरू होती.भाजपाने या प्रकल्पासाठी यापूर्वी ७५० लोकांची निवड केली होती, त्यापैकी १०० प्रमुख लोकांची पुन्हा निवड करण्यात आली. आता या व्यावसायिकांना त्या आधारावर प्रशिक्षण दिले जाईल. खरं तर, भाजपाचा हा प्रकल्प खूप मोठा आहे.

### 100 व्यावसायिकांना प्रशिक्षण देईल


मध्य प्रदेश हे भाजपाचे सर्वात मजबूत संघटन असलेल्या राज्यांपैकी एक आहे.म्हणूनच भाजपाचे सर्वात मजबूत संघटन मध्यप्रदेशात मानले जाते, म्हणूनच हा कार्यक्रम येथून सुरू केला जात आहे. ज्या लोकांना कौटुंबिक राजकीय पार्श्वभूमी नाही त्यांना राजकारणात संधी मिळावी यावर पंतप्रधान मोदी सतत भर देत आहेत.

# कुणाल कामराला मोठा दिलासा!

## कुणाल कामराला मद्रास उच्च न्यायालयाने मंजूर केला अटकपूर्व जामीन

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**स्टॅण्डअप कॉमेडिअन कुणाल कामराने राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर विडंबनात्मक गाणं रचून ते सादर केल्यानंतर तो वादात सापडला आहे. याप्रकरणी त्याच्याविरोधात गुन्हा दाखल झाला असून शिवसेनेच्या नेत्यांकडून कामरा याला अटक करण्याची मागणी केली जात आहे.**




यादरम्यान कुणाल कामराने मद्रास उच्च न्यायालयात धाव घेत अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता. त्यानंतर आता मद्रास उच्च न्यायालयाने शुक्रवारी त्यांचा अंतरिम अटकपूर्व जामीनाचा अर्ज मंजूर केला. कामरा याला ७ एप्रिलपर्यंत दिलासा मिळाला आहे. कारण त्याच्या वकिलांनी महाराष्ट्रातील न्यायालयांमध्ये जाण्यासाठी पुरेसा वेळ देण्याची विनंती उच्च न्यायालयाकडे केली होती.न्यायमूर्ती सुंदर मोहन यांच्या खंडपीठाने हा अर्ज मंजूर करताना म्हटले आहे की, कुणाल कामरा यांनी प्राथमिकदृष्ट्या मद्रास उच्च न्यायालयाला खात्री पटवून दिली की तो संरक्षणासाठी महाराष्ट्रातील न्यायालयांमध्ये जाऊ शकत नाहीत. तसेच न्यायमूर्ती मोहन यांनी असेही निरीक्षण नोंदवले की, या प्रकरणात कोठडीत चौकशी करण्याची आवश्यकता नाही आणि महाराष्ट्रातील मंत्री आणि पक्षाचे कार्यकर्ते धमक्या देत असल्याने कामरा जामीनासाठी येथील न्यायालयांमध्ये जाऊ शकत नाही आणि त्यामुळे महाराष्ट्रातील न्यायालयांमध्ये अंतरिम अटकपूर्व जामीन नंतर मागितला जाईल. दरम्यान या सुनावणीवेळी कामराच्या वकिलांने उच्च न्यायालयाला सांगितले की, त्याला (कुणाल कामरा) ५०० हून अधिक धमक्यांचे फोन आले आहेत. "ते म्हणतात की ते 'शिवसेना स्टाईलने त्याला धडा शिकवतील'. 'शिवसेना स्टाईल' म्हणजे काय हे सर्वांना माहिती आहे... हॉटेलमध्ये तोडफोड करणाऱ्यांवर कोणतीही गंभीर कारवाई झाली नाही, त्यांना जामिनावर सोडण्यात आले. अशाच प्रकारच्या धोका मला आहे. मी नेहमीच सांगत आलो आहे की माझा संविधानावर विश्वास आहे," असे कामराच्या वकिलांनी कोर्टात सांगितले. कामराच्या वकिलांनी कोर्टात सांगितले की, त्याच्या स्टँड अप दरम्यान कोणाचेही नाव घेतले नाही आणि अनेक व्यक्तींवर भाष्य केले आहे.

### नेमकं प्रकरण काय?

स्टॅण्डअप कॉमेडिअन कुणाल कामराने आपल्या शोमध्ये राज्यातील राजकीय परिस्थितीवर भाष्य करत टीका केली होती. यामध्ये कुणाल कामराने शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या फुटीचा संदर्भ दिला होता. यामध्ये कुणाल कामरा शोमध्ये म्हटलं होतं की, "महाराष्ट्राच्या निवडणुकीत त्यांनी काय केलं आहे, त्यांना सांगावं लागेल.

# ‘सिकंदर’ चित्रपटाचं तिकिट मिळतंय २२०० रुपयांत!



सलमान खान आणि रश्मिका मंदाना यांच्या ‘सिकंदर’ चित्रपटाची क्रेझ सध्या मोठ्या प्रमाणात पाहायला मिळत आहे. चहूबाजूला ‘सिकंदर’ चित्रपटाची चर्चा सुरू आहे. ३० मार्चला हा बहुचर्चित चित्रपट प्रदर्शित होणार आहे. प्रेक्षक या चित्रपटाची आतुरतेने वाट पाहत आहेत. पण, ‘सिकंदर’ चित्रपटाच्या तिकिटाचे दर गगनाला भिडले आहेत. सिंगल स्क्रीनवर ‘सिकंदर’ची तिकिटं खूप महाग आहेत. ईदच्या मुहूर्तावर प्रदर्शित होणारा ‘सिकंदर’ चित्रपट बॉक्स ऑफिसवर बक्कळ कमाई करणार असल्याचा अंदाज लावला जात आहे. चित्रपट प्रदर्शित होण्यासाठी अवघे दोन दिवस बाकी आहेत. पण, त्याआधीच ‘सिकंदर’ चित्रपटाने कोट्यवधींची कमाई केली आहे. त्यातच तिकिटाचे दर मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. मेट्रो सिटीजमध्ये ‘सिकंदर’ची तिकिटं दोन हजारांहून अधिक रुपयांत विकली जात आहेत. २५ मार्चपासून ‘सिकंदर’ चित्रपटाच्या ॲडव्हान्स बुकिंगला सुरुवात झाली आहे. तेव्हा पहिल्याच दिवशी या चित्रपटाची कोट्यवधींची तिकीट विकली गेली. माहितीनुसार, मल्टिप्लेक्सने प्रीमियम तिकिटाचे दर वाढवले आहेत. दिल्लीतील साकेत येथील डीएलएफ मॉलमध्ये वीआयपी तिकिट ८०० रुपये आहे. तर नोएडाच्या मॉल ऑफ इंडियामध्ये सकाळच्या शोमध्ये रिक्लाइनरची किंमत १००० रुपये आहे.

# हृतिकचं दिग्दर्शनात पदार्पण

बॉलीवूडमधील सध्याच्या काही आघाडीच्या अभिनेत्यांपैकी एक लोकप्रिय अभिनेता म्हणजे हृतिक रोशन. आतापर्यंत हृतिकने अनेक सुपरहिट चित्रपटांमध्ये काम केले. बॉलीवूडचा ‘ग्रीक गॉड’ म्हणूनही त्याला ओळखले जाते. ‘क्रिश’, ‘वॉर’यांसारख्या अनेक ॲक्शन चित्रपटांमधील त्याच्या भूमिका चांगल्याच गाजल्या. अभिनेता म्हणून आजवर आपल्या प्रेक्षकांचे मनोरंजन करणारा हृतिक आता लवकरच दिग्दर्शक म्हणून भेटीला येणार आहे. हृतिकचे वडील राकेश रोशन यांनी स्वत: याविषयी सांगितलं आहे. आदित्य चोप्रा यांच्याबरोबर मिळून ते ‘क्रिश ४’ ची निर्मिती करणार आहेत. पुढच्या वर्षी २०२६ च्या सुरुवातीला या चित्रपटाच्या शूटिंगला सुरुवात होणार आहे. पिंकव्हिलाच्या रिपोर्ट्सनुसार, हृतिक रोशन ‘क्रिश ४’ मध्ये तो दिग्दर्शकाची भूमिकाही साकारणार आहे.याबद्दल राकेश रोशन यांनी आपल्या इन्स्टाग्रामवर लेकाबरोबरचा खास फोटो शेअर केला आहे आणि असं म्हटलं आहे की, “डुग्गू २५ वर्षांपूर्वी मी तुला अभिनेता म्हणून लाँच केले होते आणि आज पुन्हा २५ वर्षांनंतर मी तुला दिग्दर्शक म्हणून लाँच करत आहोत. जेणेकरून मी आदित्य चोप्राबरोबरचा सर्वात महत्त्वाकांक्षी चित्रपट पुढे नेऊ शकेन. याबद्दल तुला आशीर्वाद आणि यश मिळो या शुभेच्छा.”राकेश रोशन यांना या गोष्टीचा आनंद आहे की, आदित्य चोप्रा ‘क्रिश ४’ चे निर्माते आहेत.



# जेमीला तिच्या लूकमुळे नकारात्मक प्रतिक्रिया

बॉलीवूड इंडस्ट्री असो वा मराठी इंडस्ट्री... या क्षेत्रात काम करताना अनेक कलाकार मंडळींना कधी ना कधी त्यांच्या दिसण्यामुळे ट्रोलिंग आणि नकारात्मक प्रतिक्रियांचा सामना करावा लागतो. मुख्यत: या क्षेत्रात काम करताना अनेक महिला कलाकारांना अशा घटनांचा अधिक सामना करावा लागतो. असंच एका कलाकाराबरोबरही झालं होतं आणि ही कलाकार म्हणजे बॉलीवूडमधील लोकप्रिय व विनोदी अभिनेते जॉनी लिवर (JOHNNY LEVER) यांची मुलगी जेमी लिवर (JAMIE LEVER). जेमीला तिच्या लूकमुळे नकारात्मक प्रतिक्रियांचा सामना करावा लागला होता.जॉनी लिवर यांनी आजवर अनेक सुपरहिट हिंदी चित्रपटांमध्ये काम केलं आहे. आपल्या विनोदी भूमिकांनी त्यांनी प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवत त्यांची मुलगी जेमी लिवर हिनं या क्षेत्रात पदार्पण केलं आहे. मात्र, इतर स्टार किड्सप्रमाणे तिला अगदी सहज प्रसिद्धी मिळालेली नाही. ती संघर्ष करीत या क्षेत्रात स्वतःचं स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे. मात्र, तिच्या दिसण्यामुळे तिला खूप त्रास झाला होता आणि यामुळे तिच्यावर टीकाही झाली होती.जेमी लिवरनं अलीकडेच टीव्ही अभिनेत्री छवी मित्तलच्या पॉडकास्टमध्ये हजेरी लावली होती. यावेळी तिनं काही वर्षांत लोकांच्या मताचा आणि टीकेचा कसा सामना केला आणि याचा तिच्यावर कसा परिणाम झाला याबद्दल सांगितलं. त्याबद्दल जेमी म्हणाली, “एके दिवशी मी फोटोशूट करीत होती आणि मेकअप आर्टिस्टने सांगितलं की, माझं नाक खूप मोठं असल्यानं ते कापावं लागेल. असं वाटतं की, तू कधीच चांगली दिसणार नाहीस.”त्याशिवाय जेमीनं हेही सांगितलं की, तिला लहानपणी लठ्ठपणाचा सामना करावा लागला. तिला पीसीओएस असल्यानं वजन कमी करणं सोपं नव्हतं. त्यामुळे तिला असंही सांगण्यात आलं की, मोठी कंबर असणं चांगलं नाही. म्हणूनच ती नेहमीच तिचं शरीर झाकून ठेवत असे.



# कॅन्सरशी लढणाऱ्याहिनाला संजय दत्तने दिला सल्

प्रसिद्ध टीव्ही अभिनेत्री हिना खान गेल्या अनेक दिवसांपासून तिच्या आयुष्यातील सर्वात कठीण टप्प्यातून जात आहे. अभिनेत्री गेले काही दिवस ब्रेस्ट कॅन्सरशी झुंज देत आहे आणि यासाठी ती अनेक तपासण्या आणि ऑपरेशन्सला सामोरी जात आहे. हिना खानला स्वत:च्या आजाराबद्दल कळताच ती अजिबात खचून गेली नाही आणि तिचा हाच गुण चाहत्यांनादेखील आवडला. अभिनेत्री तिच्या आजारपणातही सोशल मीडियावर कायम सक्रिय असते. सोशल मीडियाद्वारे ती तिच्या आजारपणाबद्दलची माहिती देते. अशातच तिने अभिनेता संजय दत्तबद्दल भाष्य केलं आहे. अभिनेत्याने तिला आजारपणात कशी साथ दिली याविषयी सांगितलं आहे. ‘पिंकव्हिला’शी झालेल्या संभाषणात हिना खानने कर्करोगाचे निदान झाल्याचे कळताच संजय दत्तने तिच्या आजारपणाबद्दल चौकशी केल्याचे सांगितले.संजय दत्तबद्दल बोलताना हिना खानने म्हटलं की, “मी दुसऱ्या दिवशी त्यांना भेटले. आम्ही काही वेळ एकत्र घालवला. आम्ही आमच्या प्रवासाबद्दल चर्चा केली. या काळात सकारात्मक राहण्याचा सल्ला त्यांनी मला दिला. हिना, लक्षात ठेव, तुला कधीच कर्करोग झाला नव्हता, आताही नाही आणि तुला तो कधीच होणार नाही, फक्त हे लक्षात ठेव, बाकी काही नाही.

# आरसीबीने चेपॉकचं चक्रव्यूह भेदले!

## चेपॉकच्या मैदानावर आरसीबीने 50 धावांनी विजय नोंदवला

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने चेन्नई सुपर किंग्सवर धुव्वाधार विजय मिळवला आहे. चेपॉकच्या मैदानावर आरसीबीने ५० धावांनी मोठा विजय नोंदवला. आरसीबीने २००८ नंतर म्हणजेच ६१५५ दिवसांनंतर चेन्नईच्या घरच्या मैदानावर विजयाची चव चाखली. धोनी मैदानावर असूनही सीएसकेच्या संघाला विजय मिळवून देण्यात अपयशी ठरला. संपूर्ण सामन्यात आरसीबीच्या संघाने सीएसकेवर दबाव कायम ठेवला.**



नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करत आरसीबीने दिलेल्या १९७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना सीएसकेची सुरुवात खूपच खराब झाली. सीएसकेला दुसऱ्याच षटकात २ विकेट्सचा धक्का बसला, यानंतर सीएसके या धक्क्यांमधून सावरू शकली नाही. हेझलवूडने दुसऱ्या षटकात राहुल त्रिपाठी ५ धावा करत तर ऋतुराज गायकवाड खातेही न उघडता झेलबाद झाला. यानंतर दिपक हुडा ४ धावा तर सॅम करन ८ धावा करत बाद झाले. तर रचिन रवींद्र एका टोकाकडून संघाचा डाव धरून होता. रचिन रवींद्र ३१ चेंडूत ५ चौकारांसह ४१ धावा करत बाद झाला. तर शिवम दुबे १९ धावा करत बाद झाला. जडेजा २५ धावा, तर आर अश्विन ११ धावा करत बाद झाला. तर धोनीने १६ चेंडूत ३ चौकार आणि २ षटकारांसह ३० धावांची नाबाद खेळी केली.यश दयालने देखील १३व्या षटकात रचिन रवींद्र आणि शिवम दुबेला बाद करत चेन्नईच्या विजयाच्या आशांवर पाणी फेरलं. संपूर्ण सामन्यात आरसीबीचा संघ चेन्नईपेक्षा एक पाऊल पुढे होता आणि शेवटपर्यंत आरसीबीने हाच दबाव कायम ठेवला. आरसीबीकडून जोश हेझलवूडने ३, यश दयाल, लियाम लिव्हिंगस्टोन यांनी २-२ विकेट तर भुवनेश्वर कुमारने १ विकेट घेतली. तत्पूर्वी सीएसकेने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि आरसीबीला फलंदाजासाठी पाचारण केले. फिल सॉल्ट आणि विराट कोहली यांनी संघाला एकदम 'रॉयल' अंदाजात सुरुवात करून दिली. या दोघांनी मिळून पॉवरप्लेमध्ये ५६ धावा उभारल्या. धोनीच्या चपळाईपुढे फिल सॉल्टला स्टम्पिंग करत संघाला ब्रेकथ्रू मिळवून दिला. फिल सॉल्ट १६ चेंडूत ३२ धावा करत बाद झाला. तर विराट कोहलीने ३० चेंडूत २ चौकार आणि एका षटकारासह ३१ धावा केल्या.यानंतर आलेल्या देवदत्त पडिक्कलच्या खेळीने सर्वांनाच प्रभावित केलं. त्याने छोटी पण प्रभावी खेळी खेळत १४ चेंडूत २ चौकार आणि २ षटकारांसह २७ धावा केल्या आहेत.

### सीएसकेची खराब सुरुवात

यानंतर कर्णधार रजत पाटीदारने ३२ चेंडूत ४ चौकार आणि ३ षटकारांसह ५१ धावा केल्या. लिव्हिंगस्टोन आणि जितेश शर्मा एकेक मोठे फटके खेळत बाद झाला. संघाला चेन्नईविरूद्ध विजय मिळवायचा असल्यास संघाला २०० धावांचा पल्ला गाठणं महत्त्वाचं होतं आणि ही कामगिरी टीम डेव्हिडने पूर्ण केली. टीम डेव्हिडने ८ चेंडूत ४ षटकार आणि एका चौकारासह २२ धावा केल्या. डेव्हिडने अखेरच्या षटकात सलग तीन षटकार लगावत संघाची धावसंख्या १९६ धावांवर नेऊन ठेवली. सीएसकेच्या संघाला त्यांच्या खराब फिल्डिंगचा मोठा फटका बसला, त्यांनी रजत पाटीदार ३ झेल सोडले आणि सामनावीर ठरलेल्या रजतने संघासाठी महत्त्वपूर्ण खेळी खेळली.णेफेक गमावून प्रथम फलंदाजी करत आरसीबीने दिलेल्या १९७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना सीएसकेची सुरुवात खूपच खराब झाली.

# कोहलीने खलीलवर टाकला जळता कटाक्ष

## कोहली वेगळ्याच अंदाजात दिसला, व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आयपीएलमधील अजून एक बहुप्रतिक्षित सामना म्हणजे चेन्नई सुपर किंग्स वि. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू. हा सामना चेपॉकच्या मैदानावर खेळवला जात आहे. जिथे आरसीबीने नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करत १९६ धावा केल्या. संघाचा कर्णधार रजत पाटीदारने शानदार अर्धशतक झळकावले. तर विराट कोहली आणि फिल सॉल्टने चांगली सुरुवात करून दिली. पण या सामन्यात विराट कोहलीने सुरुवातीलाच खलील अहमदला डोळे दाखवले, या घटनेचा व्हिडिओ सोशल मिडियावर व्हायरल झाला आहे.**



चेन्नई सुपर किंग्ससमोर विराट कोहली वेगळ्याच अंदाजात दिसला. कोहलीबरोबर सलामीला आलेल्या फिल सॉल्टने आकर्षक फटके मारले. तर सीएसकेसाठी नव्या चेंडूने गोलंदाजी करणारा खलील अहमद उत्कृष्ट लयीत गोलंदाजी करत होता. त्याने पहिल्याच षटकात विराट कोहलीशी पंगा घेतला.चेपॉकच्या मैदानावर चेन्नईचा वेगवान गोलंदाज खलील अहमद चांगल्याच फॉर्मात आहे. खलीलने पहिल्याच चेंडूवर विराटला टाकलेला चेंडू पॅडवर जाऊन आदळला आणि खलील अहमदने पंचांच्या निर्णयापूर्वी सेलिब्रेट करण्यासाठी धावत गेला. पण विराटला खात्री होती की तो बाद नव्हता. तर धोनीनेही ऋतुराज गायकवाडला रिव्ह्यू घेण्यास सांगितले.

रिव्ह्यूमध्ये बॅटला चेंडू न लागल्याचे दिसले, पण बॉल ट्रॅकिंगमध्ये चेंडू पिचिंग आऊटसाईड ऑफ असल्याने विराट नाबाद राहिला.यानंतर विराट कोहलीला बाऊन्सर लागल्याने तो शॉट खेळू शकला नाही. यावर खलील अहमद क्रीझवर जाऊन उभा राहिला आणि त्याच्याकडे बघू लागला. याच्या प्रत्युत्तरात कोहलीनेही त्याला डोळे दाखवले आणि मग खलील पुढे निघून गेला. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. चाहत्यांनी खलीलला ट्रोल केले आहे.आरसीबीने नाणेफेक गमावत प्रथम फलंदाजीसाठी उतरला. फिल सॉल्ट १६ चेंडूत ३२ धावा करत बाद झाला. तर विराट कोहलीने ३० चेंडूत २ चौकार आणि एका षटकारासह ३१ धावा केल्या. तर देवदत्त पडिक्कलनेही छोटी पण प्रभावी खेळी केली. त्याने १४ चेंडूत २ चौकार आणि २ षटकारांसह २७ धावा केल्या आहेत.

### खलील अहमद चांगल्याच फॉर्मात

यानंतर कर्णधार रजत पाटीदारने ३२ चेंडूत ४ चौकार आणि ३ षटकारांसह ५१ धावा केल्या. लिव्हिंगस्टोन आणि जितेश शर्मा एकेक मोठे फटके खेळत बाद झाला. तर नंतर टीम डेव्हिडने ८ चेंडूत ४ षटकार आणि एका चौकारासह २२ धावा केल्या. डेव्हिडने अखेरच्या षटकात सलग तीन षटकार लगावत संघाची धावसंख्या १९६ धावांवर नेऊन ठेवली.चेन्नई सुपर किंग्ससमोर विराट कोहली वेगळ्याच अंदाजात दिसला. कोहलीबरोबर सलामीला आलेल्या फिल सॉल्टने आकर्षक फटके मारले. तर सीएसकेसाठी नव्या चेंडूने गोलंदाजी करणारा खलील अहमद उत्कृष्ट लयीत गोलंदाजी करत होता. त्याने पहिल्याच षटकात विराट कोहलीशी पंगा घेतला.चेपॉकच्या मैदानावर चेन्नईचा वेगवान गोलंदाज खलील अहमद चांगल्याच फॉर्मात आहे. खलीलने पहिल्याच चेंडूवर विराटला टाकलेला चेंडू पॅडवर जाऊन आदळला आणि खलील अहमदने पंचांच्या निर्णयापूर्वी सेलिब्रेट करण्यासाठी धावत गेला. पण विराटला खात्री होती की तो बाद नव्हता. तर धोनीनेही ऋतुराज गायकवाडला रिव्ह्यू घेण्यास सांगितले. रिव्ह्यूमध्ये बॅटला चेंडू न लागल्याचे दिसले, पण बॉल ट्रॅकिंगमध्ये चेंडू पिचिंग आऊटसाईड ऑफ असल्याने विराट नाबाद राहिला.यानंतर विराट कोहलीला बाऊन्सर लागल्याने तो शॉट खेळू शकला नाही.

स्मार्ट PCMC SMART CITY
# महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। शनिवार ।
। दि. 29 मार्च 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## ले. कर्नल विनीत नारायण यांचे प्रतिपादन

# तरच भावी पिढी सुदृढ, निरोगी होईल!

### पीसीयु वसुंधरा वृक्षारोपण मोहीम आणि हरित तंत्रज्ञान विषयावर चर्चासत्र संपन्न



। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**सध्या पर्यावरणाशी संबंधित अनेक बदल होत असल्याचे दिसून येते. स्वच्छ, सुंदर पर्यावरणासाठी झाडे लावून ती जगवली पाहिजेत; तरच आपण जीवन चांगले जगू शकतो. आपली भावी पिढी सुदृढ, निरोगी राहू शकेल. त्यामुळे पर्यावरण आणि नैसर्गिक साधन संपत्ती रक्षणाचे कार्य करण्यासाठी सर्वांनी पुढे आले पाहिजे, असे मत राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाच्या पुणे विभागाचे प्रमुख ले. कर्नल विनीत नारायण यांनी व्यक्त केले.**

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) संचालित साते, वडगाव मावळ येथील पिंपरी चिंचवड विद्यापीठात (पीसीयु) केंद्रीय सहकार मंत्रालयाच्या राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाच्या वतीने पीसीयु वसुंधरा वृक्षारोपण मोहीम आणि हरित तंत्रज्ञान या विषयावर शुक्रवारी (२८ मार्च) चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. यावेळी ले. कर्नल नारायण यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी सीए अमृता कुलकर्णी, पीसीईटीचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पीसीयुचे प्र- कुलगुरू डॉ. सुदीप थेपडे, व्यवस्थापन विभाग प्रमुख डॉ. अमित पाटील, संगणक विभागप्रमुख डॉ. कमलेश मेश्राम आदी उपस्थित होते.

सामाजिक बांधिलकी जपत देशाचे भावी नागरिक घडविण्याचे कार्य पीसीईटी शैक्षणिक संकुलात व्दारे केले जाते आहे. विविध विद्याशाखां मधून वीस हजारांहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत असून एक हजारांपेक्षा अधिक शिक्षक ज्ञानदानाचे कार्य करीत आहेत. पीसीईटी शाश्वत विकासासाठी नेहमीच प्रयत्नशील आहे. पर्यावरण रक्षण आणि निसर्ग संवर्धनाच्या दृष्टीने पीसीयु वसुंधरा वृक्षारोपण उपक्रम राबविण्यात आला आहे. यासाठी राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाचे मोलाचे सहकार्य लाभले असे डॉ. गिरीश देसाई यांनी सांगितले.

यानंतर झालेल्या चर्चासत्र अभिजित बेंद्रे यांनी ग्रामीण विकासासाठी नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान, विद्याधर कुलकर्णी यांनी सेंद्रिय शेती तर अमोल साळगावकर यांनी मत्स्यपालन उत्पादक शेतकरी योजना या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी विविध विद्याशाखेचे प्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

प्रास्ताविक डॉ. सुदीप थेपडे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. सायली कारंडे व प्रा. अभिजिता पुहान यांनी केले. डॉ. अमित पाटील यांनी आभार मानले.पीसीयू चे कुलपती हर्षवर्धन पाटील, पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्मा भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, पीसीयू व्यवस्थापन समिती सदस्य अजिंक्य काळभोर, नरेंद्र लांडगे, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई त्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

---

## औंध औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन

### विविध ट्रेडचे शिक्षण पूर्ण केलेले सुमारे 104 माजी विद्यार्थी- विद्यार्थिनींनी सहभागी

। पिंपरी ।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**औंध येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत तांत्रिक प्रशिक्षण पूर्ण केलेल्या माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन बोऱ्हाडेवाडी, मोशी येथे अतिशय उत्साहात संपन्न झाले. रविवार दि.२३ मार्च रोजी संपन्न झालेल्या या स्नेहसंमेलनात तत्कालीन शिक्षकांसह विविध ट्रेडचे शिक्षण पूर्ण केलेले सुमारे १०४ माजी विद्यार्थी- विद्यार्थिनींनी सहभागी झाले होते.**



सकाळपासून सायंकाळ पर्यन्त चाललेल्या या कार्यक्रमात उपस्थित तत्कालीन शिक्षक विठ्ठल सस्ते, दीपक जगताप रामभाऊ पिसे, माजी विद्यार्थी प्रतिनिधी निवेदक किशोर केदारी, सुरेन्द्र रानवडे, संजय हांडे तसेच अन्य विद्यार्थ्यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी पुणे ते कन्याकुमारी दरम्यान सायकल प्रवास करणारे विकास भोर, 96 दिवसांत पायी प्रवास करून नर्मदा परीक्रमा पूर्ण करणारे ज्येष्ठ पत्रकार सदाशिव अमराळे ,रोटरी क्लबच्या निर्मला नलLवडे, सोसायटी महासंघाच्या अध्यक्षपदी नव्याने निवड झालेले नवनाथ नलावडे यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

दरम्यान बहुसंख्य विद्यार्थी व विद्यार्थिनींनी विविध गुणदर्शन या सदरात कथा, कविता, हास्य-विनोद, गीत गायन, नृत्य सादर केले. या संमेलनात सुमारे 30-35 वर्षानंतर काही विद्यार्थी विद्यार्थिनी एकत्र आल्याने त्यांचा आनंद गगनात मावत नव्हता. एक दुसर्यांची विचारपूस करताना व छायाचित्र काढताना सगळे रमबाण व गुंग होतें.

हे संमेलन व्यवस्थित रित्या पार पाडण्यासाठी नवनाथ नलLवडे, सदाशिवआमराळे, दतात्रेय वर्पे, सुदाम कुदळे, अशोक जाधव, अनिल पानसरे, सावता कुदळे, पिराजी ताम्हाणे, संजय जठार, राजेंद्र यादव, सतिश खेडकर, शारदा ठकLर, सुरेन्द्र रानवडे, राजेश हांडे किशोर केदारी, बापू लव्हे, देविका दाते आदींनी मेहनत घेतली. नवनाथ नलवडे यांनी सूत्रसंचालन केले.


Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42
Years of Excellence in Education
EDUCATING MIND & HEART
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic Empowering Learning
IT ALL STARTS HERE
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17K+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+
TEACHING AND NON TEACHING STAFF
13K+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org


MASTER MIND GLOBAL
SCHOOL & Jr. College
(CBSE)
( Since 2013)
ADMISSIONS
OPEN FOR
NURSERY TO 12TH
Where There is
Creativity, There is
Master Mind
CREATIVE
7
STAR
RANKING
Excellence in Education & Disciplined Environment
Co-Curricular & Extra Curricular Activities
Guaranteed Safety & Security
A++ Grade
In Leadership & Quality
Management
Contact : +91 7218125125
E-mail : mastermindglobalschool.com
Website : www.http://mastermindglobalschool.com

# मोरया शिक्षण संस्था

## Computer Vacation Batch



**ADMISSIONS OPEN**
**2025-26**

| | | | |
|---|---|---|---|
| 'C' भाषा ₹ १३००/- | 'C++' भाषा ₹ १३००/- | बेसिक जावा ₹ १३००/- | स्क्रॅच ॲनिमेशन ₹ १३००/- |
| बेसिक टॅली ₹ १५००/- | एम.एस. ऑफिस ₹ १५००/- | कोरल ड्रॉ ₹ ११००/- | Adobe AB फोटोशॉप ₹ ११००/- |

सर्व कोर्स 20 मार्च 2025 पासून सुरू होत आहेत. इच्छुक पालक, विद्यार्थी व इतर शाळेतील विद्यार्थ्यांनी खालील नंबरवर संपर्क करून प्रवेश निश्चित करावा. अथवा शाळेतील संगणक कक्षात येऊन अधिक माहिती घ्यावी.

**ठिकाण: संगणक लॅब, व्ही. के. माटे हायस्कूल, चिंचवड. संपर्क : 8087706100**